वर्ष : ०४ | अंक: ३ | मुंबई, मंगळवार १२ डिसेंबर २०१७ ते १८ डिसेंबर २०१७ | पृष्ठ: ८

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 सरकार बॅनरबाजी कशी रोखणार? -उच्च न्यायालय

3 → व्यवहारात मराठी वापरासाठी शासनाला आली जाग

'झोपु' योजनेतील घर मुदतपूर्व विकता येणार? ← 4




## बोरिवली ते वसईचा प्रवास होणार जलद



मुंबई - बोरिवलीपासून वसईकडे जाणाऱ्यांचा प्रवास आता वेगवान होणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे (एमएमआरडीए) मीरा-भाईदर- वसई- नायगाव जोडण्यासाठी पाच किलोमीटर लांबीचा पूल बांधण्यात येणार आहे. या पूलाचे काम मार्च २०१८ सालामध्ये सुरू करण्यात येणार आहे. हा पूल भाईदर पश्चिम ते नायगाव येथील संत जलाराम नगरपर्यंत बांधण्यात येणार आहे. यामुळे बोरिवलीवसईपर्यंतचा प्रवास जलद आणि सुखकर होणार आहे.

उर्वरित पृष्ठ 2 वर

## काँग्रेसमध्ये राहुलपर्वाचा आरंभ



### १६ डिसेंबरला अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारणार

नवी दिल्ली - गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष निवडीवर सोमवारी शिक्कामोर्तब करण्यात आले. राहुल गांधी यांची पक्षाचे नवे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. येत्या १६ तारखेला राहुल दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात त्यांची आई सोनिया गांधी यांच्याकडून अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारतील. ४ डिसेंबरला राहुल गांधी यांनी पक्षाच्या अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, राहुल यांच्याविरोधात एकही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला नव्हता. उमेदवारी अर्ज दाखल मागे घेण्याची आजची शेवटची तारीख होती. परंतु, राहुल यांना अध्यक्षपदासाठी कोणीही आवाहन न दिल्यामुळे त्यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.

उर्वरित पृष्ठ 2 वर

## राष्ट्रीय बाणा दाखवणारे गुजराती अस्मितेत अडकले

### सेनेची मोदींवर टीका



मुंबई - पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणातून विकासाचा मुद्दा गायब झाला असून ते आता स्वत:च्याच राज्यात हमरीतुमरीवर आले आहेत. ज्या राज्यात २२ वर्षे राज्य केले तिथे खालच्या पातळीवर प्रचार करण्याची वेळ भाजपवर का आली असा सवाल, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रचारात 'अफझलखान', 'शाईस्तेखान' यांचा प्रवेश प्रचारात होताच. भाजपने सेनेच्या नेत्यांना प्रचार पातळी सोडल्याचे लक्षण असल्याचे सांगितले होते. पण गुजरातच्या प्रचारसभातून स्वत: पंतप्रधान मोदी यांनीच 'मुगल' राजवट कबरीतून उकरून काढल्याचा आरोप त्यांनी केला. गुजरातचा प्रचार विकासाच्या मुद्यावर होणे गरजेचे होते. पण मोदींच्या भाषणातून विकासाचा मुद्दा गायब झाला असून ते आपल्याच राज्यात हमरीतुमरीवर आल्याचे त्यांनी म्हटले. काँग्रेसचे नेते मणिशंकर अय्यर यांनी पंतप्रधानांच्या बाबत 'नीच' असा शब्द वापरल्यानंतर तो देशाचा नव्हे तर गुजरातचा अपमान झाल्याचे मोदी सांगत सुटले आहेत. राष्ट्रीय बाणा वगैरे दाखवून विरोधकांना गप्प करणारे मोदी आता गुजरातीत अस्मितेत अडकले असल्याची वर्मी टीका ही त्यांनी केली.

शिवसेनेच्या 'सामना' या मुखपत्रातील अग्रलेखातून ठाकरे यांनी भाजपवर टीकेची तोफ डागली. गुजरात निवडणुकीत मोदी हे राष्ट्रीय कमी व क्षेत्रीय जास्त झाले आहेत. इतरांनी त्यांच्या प्रांतीय अस्मितेच्या तलवारी उपसल्या की, त्यांनी राष्ट्रीय बाणा दाखवत गप्प करणारे मोदी सध्या गुजराती अस्मितेत अडकले आहेत. ज्या राज्यात इतके वर्षे राज्य केले. त्या राज्यात केंद्रीय मंत्रिमंडळ, भाजपशासित राज्यातील मुख्यमंत्री, पदाधिकारी यांना घेऊन राहुल गांधी यांच्या विरोधात तुताऱ्या का फुंकत आहेत, असा प्रश्न उपस्थित केला. विकासाचा मुद्दाही बिनकामाचा असल्याचे भाजपने गुजरातेत दाखवून दिल्याचे त्यांनी म्हटले. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावरही टीका केली.

## नेते तुपाशी, पोलीस उपाशी

### डाळ-भात खाऊन पोलिसांची अधिवेशनाला सुरक्षा


**नागपूर: नेते तुपाशी, पोलीस उपाशी अशीच परिस्थिती नागपुरात पाहायला मिळाली. राज्याच्या हिवाळी अधिवेशन काळात कायदा-सुव्यवस्था सांभाळण्यासाठी तैनात असलेल्या पोलिसांना अर्धवट आणि निकृष्ट जेवण देण्यात आलं.**

पोलिसांच्या ताटात ९ पदार्थांचे आश्वासन असताना फक्त २ पदार्थच पोलिसांना देण्यात आले. हे दोन पदार्थ म्हणजे फक्त वरण आणि भातावर बोळवण करण्यात आली. चपाती, २ भाज्या, सलाड, मिठाई, लोणचे, पापड यापैकी एकही पदार्थ पोलिसांना मिळाला नाही. इतकंच नाही तर, उभं राहून, नेहमीच सतर्क असणाऱ्या पोलिसांना सकाळचे जेवण दुपारनंतर म्हणजेच साडे तीन वाजता देण्यात आले.



राज्याचा सरकार तुपाशी आणि सरकारच्या सुरक्षेसाठी तैनात हजारो पोलीस उपाशी, असं चित्र नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी पाहायला मिळालं. जर पोलीस सशक्त असेल, तर समाज सशक्त, सुरक्षित राहील. मात्र पोलिसांनाच जर दुपारी तीन-साडेतीन वाजता जेवण मिळणार असेल, तर पोलीस आपली शारीरिक क्षमता कशी टिकवून ठेवणार आणि समाजाचं रक्षण कसं करणार हा प्रश्न आहे.

## कात्रज बोगद्याजवळ भीषण अपघात ४ ठार



पुणे - पुणे-सातारा मार्गावर जांभुळवाडी येथे कात्रज बोगद्याजवळ आज पहाटे कार आणि ट्रक दरम्यान झालेल्या भीषण अपघातात अख्खं कुटुंब ठार झालं. या अपघातात एकूण चारजण जागीच ठार झाले असून त्यात तीन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. हे सर्वजण मुंबईतील चुनाभट्टी येथील रहिवासी आहेत. या अपघातात यशवंत पांडुरंग माने (४७), त्यांची पत्नी शारदा माने, मुलगा ऋषीकेश माने (२०) आणि चालक रामचंद्र सुर्वे (७१) जागीच ठार झाले.


## रस्त्यावर दोन दिवस उभी असलेली वाहने होणार जप्त

**मुंबई - रस्त्यालगत बेवारस पडलेल्या वाहनांवर कारवाई करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. पालिकेने वाहनाला नोटीस चिकटवल्या नंतर ४८ तासात वाहन न हटवल्यास ते वाहन जप्त करण्यात येणार आहे. यासाठी पालिका परिमंडळात प्रत्येकी एक याप्रमाणे ७ टोईंग गाड्या तैनात ठेवणार आहे.**



मुंबईतील रस्त्यासह पदपथ व सार्वजनिक ठिकाणी वाहने उभी करून, ती हटवण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या वाहन मालकांना धडा शिकवण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. जानेवारी ते ऑक्टोबर २०१७ या दहा महिन्यात मुंबई शहर व उपनगरातून तब्बल २२३५ गाड्या जप्त केल्या. यात १२९५ दुचाकी, २४५ तीनचाकी व ६९५ चारचाकी गाड्यांचा समावेश आहे. आता बेवारसी वाहनांवरील कारवाई तीव्र करण्यासाठी मुंबईत सर्वे करण्यात येणार आहे. दरम्यान शहरात एखादे बेवारस वाहन आढळल्यास नागरिकांनी १९१६ या हेल्पलाईनवर फोन करण्याचे आवाहन पालिकेने केले आहे. दरम्यान जप्त केलेली वाहने दंड भरून एक महिन्यात सोडून नेण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यानंतर मात्र गाड्यांचा लिलाव करणार असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले.

## सौजन्य व्हॉट्सअप




## मनाई आदेश झुगारून हार्दिकचा रोड शो

***अहमदाबाद - कायदा आणि सुव्यवस्थेचं कारण देत पोलिसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी यांच्यासह दलित नेता जिग्नेश मेवाणी आणि पाटीदार आरक्षण आंदोलन समितीचा नेता हार्दिक पटेल आदींना रोड शो करण्यास परवानगी नाकारली होती. पण पोलिसांचा मनाई आदेश झुगारून हार्दिकने अहमदाबादमध्ये रोड शो करत शक्ती प्रदर्शन केलं. त्यानंतर 'ही तर केवळ सुरुवात आहे,' अशी प्रतिक्रिया द्यायलाही तो विसरला नाही.***

हार्दिकने त्याच्या समर्थकांच्या मदतीने आज दोन हजार बाइक रस्त्यावर उतरवत दणक्यात रोड शो केला. १५ किलोमीटर पर्यंत सुरू असलेल्या या रोड शोमध्ये हजारो लोक सामिल झाले होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर शक्ती प्रदर्शन झाल्याने स्वत: हार्दिकही खूश होता. या रोड शोमध्ये तरुणांचा मोठ्याप्रमाणावर सहभाग होता. यावेळी बुजुर्गांचे आशीर्वाद घेण्यासही तो विसरला नाही.



'ही तर केवळ सुरुवात आहे. दुपारनंतर नदीच्या पलिकडे जायचे आहे. लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने माझा आत्मविश्वास वाढला आहे,' असं हार्दिक म्हणाला. दुपारी ३ वाजता तो निकोलला पोहोचला. पाटीदार आरक्षण आंदोलनाच्यावेळी निकोलमध्ये सर्वाधिक हिंसा झाली होती. त्यामुळे निकोलमध्ये रोड शो करत इथल्या मतदारांशी तो संवाद साधणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.



# बोरीवली-विरार प्रवास सुखदायक होणार!



## पाचव्या-सहाव्या मार्गिकेचा विरापर्यंत विस्तार करण्याचा प्रस्ताव

**मुंबई - लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांमुळे उपनगरीय रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक कोलमडू नये, म्हणून मुंबई सेंट्रल ते बोरिवलीदरम्यान टाकण्यात येत असलेल्या पाचव्या-सहाव्या मार्गिका विरापर्यंत नेण्याचा पश्चिम रेल्वेचा विचार आहे. तसे झाल्यास विरारहून मुंबई व परतीचा प्रवास जलद आणि आरामदायी होण्याची शक्यता आहे. यासाठी पश्चिम रेल्वेकडून सर्वेक्षण करण्यात येत आहे.**

पश्चिम रेल्वेमार्गावरून धावणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध व्हावा व त्याच वेळी उपनगरीय गाड्यांच्या वेळापत्रकावर त्याचा परिणाम होऊ नये, या उद्देशाने पश्चिम रेल्वेने मुंबई सेंट्रल ते बोरिवलीपर्यंत पाचवी आणि सहावी मार्गिका टाकण्याचा योजना आखली आहे. यातील पाचवा मार्ग पूर्ण करण्यात आला असून त्यावरून सध्या बोरिवलीपर्यंत नऊ फेऱ्या चालवण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे सहावी मार्गिका २०१९पर्यंत पूर्ण करण्याचे रेल्वेचे उद्दिष्ट आहे. या दोन अतिरिक्त मार्गिकांमुळे पश्चिम रेल्वेवरील बोरिवलीपर्यंतची वाहतूक सुरळीत होणार आहे. मात्र, या मार्गिकांचा विस्तार विरापर्यंत करून उपनगरी मार्गावरील संपूर्ण वाहतूक जलद करण्याचे पश्चिम रेल्वे प्रशासनाचे ध्येय आहे.

मुंबई सेंट्रल- बोरिवली दरम्यानच्या पाचव्या-सहाव्या मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गिकांचा विरापर्यंत विस्तार करण्यात येईल. बोरिवली ते विरापर्यंत सध्या चारच मार्ग असून पाचवा आणि सहावा मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्या आणि जलद लोकल फेऱ्यांचा ताण तिसऱ्या आणि चौथ्या मार्गावर पडत आहे. लांब पल्ल्याच्या गाड्या याच मार्गावरून धावत असल्याने विरारला जाणाऱ्या आणि विरारहून सुटणाऱ्या जलद लोकल गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम होतो आणि लोकल फेऱ्या उशिराने धावतात. एकंदरीतच बोरिवली ते विरारचा प्रवास सुकर करण्यासाठीच या दरम्यान पाचवा आणि सहावा मार्ग बांधण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहिती देण्यात आली. सध्या बोरिवलीपर्यंत सहाव्या मार्गाचे काम सुरू आहे. या प्रकल्पाचा सुरुवातीचा खर्च ४३० कोटी रुपये होता आणि हाच खर्च आता ९१८ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. जमीन संपादन यासह काही तांत्रिक अडचणी यामुळे प्रकल्पाचे काम सुरू करण्यासाठी दोन ते तीन वर्षे उशीर झाला. हे काम पूर्ण झाल्यानंतर बोरिवली ते विरार पाचवा-सहाव्या मार्गाचा सर्व बाजूने विचार केला जाईल. सध्या या प्रस्तावावर विचार सुरू असल्याची माहिती पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# सरकार बॅनरबाजी कशी रोखणार? -उच्च न्यायालय

**मुंबई-** राजकीय पक्षांनी बॅनरबाजी करून शहराचा चेहरा विद्रुप करू नये, याची खात्री करून घेण्यासाठी काय पावले उचलली आहेत? अशी विचारणा उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाकडे केली. तसेच मुंबईतील सर्व अनधिकृत होर्डिंग्स हटविण्यासाठी पालिकेने काय केले, याचीही माहिती मुंबई पालिकेकडून न्यायालयाने मागितली आहे. न्या. अभय ओक व न्या. ए. ए. सय्यद यांच्या खंडपीठाने यासंदर्भात मुंबई महापालिका व निवडणूक आयोगाला ९ जानेवारीपर्यंतउत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. अनधिकृत होर्डिंग्स, पोस्टर, फ्लेक्स इत्यादी हटविण्यासंदर्भात उच्च न्यायालयाने फेब्रुवारीत तपशिलात आदेश दिला आहे. राजकीय पक्षाने बेकायदेशीरपणे बॅनर, पोस्टर्स, होर्डिंग्स लावले तर ते हटवून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, असे न्यायालयाने आदेशात स्पष्ट म्हटले आहे. राजकीय पक्षाची नोंदणी करताना संबंधित पक्ष बेकायदा बॅनरबाजी करून शहराचा चेहरा विद्रुप करणार नाहीत, तसेच संबंधित कायद्याचे पालन करतील, अशी अट घाला, अशी सूचना न्यायालयाने निवडणूक आयोगाला केली होती. शुक्रवारच्या सुनावणीत




निवडणूक आयोगाने याबाबत उत्तर देण्यास न्यायालयाकडे मुदत मागितली. तर मुंबई पालिकेने शहरात लावलेली बेकायदा होर्डिंग्स, पोस्टर, बॅनर हटविण्यासाठी अनेक उपाय केल्याची माहिती न्यायालयाला दिली.

# लेकीची सुरक्षा गावाच्या हाती!

**मुंबई - महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांमध्ये महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक असल्याचं लाजिरवाणं वास्तव नॅशनल क्राइम ब्युरोने नुकत्याच जाहीर केलेल्या आकडेवारीतून समोर आले असताना राज्यात गावागावातील लोकांनीच आपल्या लेकींच्या सुरक्षेसाठी पावलं उचलली आहेत. मुलीची सुरक्षा हा केवळ तिचा अथवा तिच्या कुटुंबाचा मामला नसून ती पूर्ण गावाची जबाबदारी आहे, या भूमिकेतून सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून ग्रामस्थांनी मुली आणि महिलांना गावात भयमुक्त वावरता यावं, यासाठी उपक्रम सुरू केले आहेत.**

महिलांच्या राजकीय हक्कांसाठी काम करणाऱ्या राजसत्ता आंदोलनाने राज्यात २० जिल्ह्यांमध्ये ८० तालुक्यांत युवती सुनवाई घेण्याचे ठरवले असून २५



नोव्हेंबरला जागतिक महिला अत्याचार विरोधी दिनी या कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढील महिनाभर ते सुरू राहील. गावातील युवतींनी पुढे येऊन बोलावं, आपल्या समस्या मांडून गावकऱ्यांच्या मदतीने उत्तरंही शोधावीत, अशी कल्पना आहे. गावातल्या मुलींनी एकत्र येऊन गावात ज्या ठिकाणी असुरक्षित वाटतं त्या ठिकाणांच्या नोंदी करायच्या, त्या ठिकाणांचे नकाशे कागद, पेन, फुलं, पानं, दगड यांच्या मदतीने तयार करायचे, गावातील अन्य मंडळींसोबत लैंगिक शोषणाविरुद्ध समिती तयार करायची. गावात कोणत्या कारणामुळे असुरक्षित वाटते याची चर्चा करायची, उपाय शोधायचे, शाळा, कॉलेजे, सरकारच्या विविध यंत्रणा, विभाग यांना भेटून त्याबद्दल तक्रारी नोंदवायच्या, त्या समस्येचे निराकरण होईपर्यंत पाठपुरावा करायचा आणि गावातील मुलींच्या सुरक्षेच्या हमीसाठी कालबद्ध कार्यक्रम आखून तो सातत्याने राबवायचा अशी ही कल्पना आहे.

# एसटीच्या १८०० सफाई कामगारांवर बेकारीची कु-हाड, सफाईसाठी खासगी कंपनीला ४४७ कोटींचे कंत्राट

**मुंबई-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) १८०० सफाई कर्मचा-यांवर बेकारीची कु-हाड कोसळणार आहे. खासगी कंपनीला बस आगार आणि स्थानके स्वच्छ करण्याचे ४४७ कोटींचे कंत्राट देण्यात आले आहे. १ डिसेंबरपासून या कंत्राटी कामाची सुरुवात होईल. या घडामोडींमध्ये महामंडळाने राज्यभर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पर्यायी नोकरी देण्याच्या धोरणाला स्थगिती दिली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे खासगी कंत्राटदारांना 'अच्छे दिन' येत असल्याने एसटी 'खासगीकरणा'च्या दिशेने जात असल्याची चर्चा एसटी वर्तुळात पुन्हा सुरू झाली आहे.

एसटी महामंडळाने मुंबईसह पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या विभागातील ३१ आगारांसह बस स्थानकांची सफाई सुमारे १८०० एसटीचे कामगार करत होते. मात्र एसटीने सफाईचे ४४७ कोटींचे कंत्राट खासगी कंपनीला दिले आहे. तीन वर्षे ही खासगी कंपनी स्थानकातील स्वच्छता करणार आहे.



एसटी महामंडळात अनुकंपा तत्त्वावर तसेच पर्यायी नोकरीमध्ये सफाई कामगार व स्वच्छक पदामध्ये नेमणूक देण्याची तरतूद आहे. मात्र खातेप्रमुखांच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार या धोरणाला स्थगिती देण्यात येत आहे. यामुळे पर्यायी धोरणानुसार सफाई कामगारांना पुढील आदेश येईपर्यंत स्थगिती देण्यात आल्याचे परिपत्रक कामगार विभागाच्या महाव्यवस्थापकांनी काढले आहे. या परिपत्रकामुळे महामंडळातील १८०० हून अधिक सफाई कामगारांवर बेकारीची कुड्हाड कोसळणार आहे. वेतनाबाबत २२ डिसेंबर रोजी महामंडळ न्यायालयात अहवाल सादर करणार आहे. महामंडळातील सफाई कामगारांना पर्यायी नोकरी न दिल्यास त्यांच्यावर उपासमारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. विशेषत: सफाई कर्मचाऱ्यांमध्ये महिलांची संख्या जास्त असल्याने त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होईल, अशी माहिती एसटीतील सूत्रांनी दिली.


सफाईगार पदांमध्ये अनुकंपा तत्त्वावर नोकरी देणे, ही धोरणात्मक बाब आहे. कामगार करारातील कलम ११२ नुसार त्यात बदल करण्यापूर्वी मान्यताप्राप्त संघटना म्हणून आमच्या संघटनेशी चर्चा करणे आवश्यक आहे.

# चटई क्षेत्र निर्देशांकांवरील निर्बंधामुळे विकास खुंटला

**मुंबई-** शहरात गर्दी वाढू नये म्हणून १९९१ च्या विकास नियंत्रण नियमावलीत चटई क्षेत्र निर्देशांक नियंत्रित ठेवण्यात आल्याने त्याचे गंभीर दुष्परिणाम शहरांना भोगावे लागत आहेत. घरांच्या किंमती वाढण्याबरोबरच झोपड्यांचे साम्राज्य पसरले आणि मुंबईचा विकास खुंटला.

१९९१ च्या विकास नियंत्रण नियमावलीत शहरासाठी १.३३ चटई क्षेत्र निर्देशांक आणि उपनगरासाठी १ चटई क्षेत्र निर्देशांक मर्यादित ठेवण्यात आला होता. शहरातील गर्दी वाढू नये म्हणून विकासालाच खीळ लावण्याचा हा प्रकार होता, असे तज्ज्ञांचे मत आहे. नव्वदच्या दशकापासून घरांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली; परंतु त्यांची निर्मिती मात्र त्या प्रमाणात झाली नाही. परिणामी घरांच्या किमती गगनाला भिडल्या. नियंत्रित चटई क्षेत्र निर्देशांकामुळे भ्रष्टाचारालाही वाव मिळाला. खुद्द पालिकेचे अधिकारीच त्याची कबुली देतात.

विकास आराखडा तयार करताना झालेली चूक सुधारण्यासाठी २७ वेळा चटई क्षेत्र निर्देशांकात फेरफार करण्यात आला; परंतु समस्या 'जैसे थे' राहिली. घरांच्या किमती वाढल्यामुळे झोपड्यांचे साम्राज्य पसरले. त्यांच्यासाठी पुनर्वसन योजना जाहीर करण्यात आली. तिला अपेक्षित यश मिळाले नाही. ही चूक सुधारण्यासाठी २०३४ च्या प्रस्तावित विकास आराखड्यात व्यवसाय आणि निवासी क्षेत्रासाठी चटईक्षेत्र वाढवून देण्यात आले आहे. त्यामुळे जुन्या इमारतींचा विकास होईल. त्याचबरोबर परवडणारी घरे बांधण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत प्रोत्साहन देण्यात आले आहे, असा महापालिका प्रशासनाचा दावा आहे.



# वऱ्हाडींचा प्रवास गारेगार बसमधून




**मुंबई- लग्न समारंभासाठी जाणाऱ्या वऱ्हाडी मंडळीचा प्रवास आता एसटीतील वातानुकूलित बसमधूनही होऊ शकतो. एसटी महामंडळाने लग्नसमारंभासाठी वातानुकूलित शिवशाही बस 54 रुपये प्रति किलोमीटर इतक्या माफक दरात देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबतचे परिपरत्रकच एसटी महामंडळाकडून काढण्यात आले आहे.**

एसटी महामंडळाकडून दोन हजार वातानुकूलित शिवशाही बस टप्प्याटप्प्यात दाखल केल्या जात आहेत. सध्या १०० पेक्षा जास्त बस सेवेत आहेत. बस दाखल झाल्यानंतर त्याला मिळणाऱ्या चांगल्या प्रतिसादामुळे महामंडळाने शिवशाही बससाठी नुकताच 'आवडेल तेथे कोठेही प्रवास' योजनेअंतर्गत पास देण्याचा निर्णही घेतला. या योजनेतंर्गत सात दिवस आणि चार दिवस पासांसाठी मूल्य आकारले जाते. यानंतर महामंडळाने लग्नसमारंभासाठी माफक दरांत वातानुकूलित बस देण्याचा निर्णय घेतला आहे. धार्मिक यात्रा, सहल आणि इतर कारणांसाठी समूहाने जाणाऱ्या लोकांसाठी वातानुकूलित बस प्रवाशांना उपलब्ध होईल. सध्या ज्या आगारांकडे या बस उपलब्ध आहेत. त्या आगारांत याबाबत अधिक चौकशी करून नोंदणी करता येईल, असे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले.


एसटीकडून साध्या बस दिल्या जात असतानाच वातानुकूलित बसही लग्नसमारंभासाठी देण्यात याव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात होती. साध्या बसकडे प्रवासी पाठ फिरवत असल्याने अखेर प्रवाशांची मागणी लक्षात घेता प्रासंगिक करारावर वातानुकूलित बस देण्यात येणार असल्याचे महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले. ८ डिसेंबरपपासून शिवशाही वातानुकूलित ४५ आसनी बस ५४ रुपये प्रति किलोमीटर दराने प्रासंगिक करारावर उपलब्ध करण्यात आली आहे.

# खोट्या जात प्रमाणपत्रावर नोकऱ्या बळकावणाऱ्यांवर कारवाई

**मुंबई - राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीयांच्या खोट्या जातीच्या प्रमाणपत्रांवर राज्य शासनाच्या सेवेतील आरक्षित नोकऱ्या बळकावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी राज्य शासन पुढे सरसावले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयासंदर्भात अवमान याचिका दाखल झाल्यानंतर तसेच काही राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांनी राज्य सरकारला कायदेशीर नोटीस दिल्यानंतर, राज्य शासनाने कारवाईच्या हालचाली सुरू केल्या आहेत.**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार खोट्या जातींच्या प्रमाणपत्रांच्या आधारावर शासकीय नोकऱ्या बळकावणाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करावी, अशी मागणी बहुजन रिपब्लिकन समाजवादी पक्षाचे अध्यक्ष ॲड. सुरेश माने व अन्य दोन कार्यकर्त्यांनी या नोटिशीच्या माध्यमातून केली आहे.

साधारणत १९९० नंतर राज्य शासनाच्या सेवेतील मागासवर्गीयांच्या आरक्षित जागांवर काही बिगरमागास व्यक्तींनी जातीची खोटी प्रमाणपत्रे सादर करून वर्णी लावून घेतल्याची प्रकरणे उघडकीस आली. विशेषत अनुसूचित जमातीसाठी (आदिवासी) राखीव असलेल्या जागा बिगर आदिवासींनी बळकावल्याचे आढळून आल्यानंतर त्याविरोधात राज्य शासनाने कारवाई करण्यास सुरुवात केली. मात्र राजकीय दबावामुळे पुढे कारवाई थांबली. किंबहुना १९९५ व २०१५ मध्ये राज्य शासनाने स्वंतत्र आदेश काढून अशा बोगस आदिवासी अधिकारी-कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याचा निर्णय घेतला. सर्वोच्च न्यायालयाने अशाच एका प्रकरणात ६ जुलै २०१७ रोजी महत्त्वाचा निर्णय दिला. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागासवर्गीय या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासन सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर त्यांचे जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे. परंतु त्यावर पुढे प्रभावी अशी काहीच कारवाई झाली नाही.


कार्यालय प्रखण्ड विकास पदाधिकारी,
जाति प्रमाण-पत्र
FAKE

# भुजबळ यांच्या जामिनावर १८ डिसेंबरला निकाल

**मुंबई-** कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी सध्या तुरुंगात असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री छगन



भुजबळ यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी शुक्रवारी पूर्ण झाली. त्यांच्या जामिनाबाबत येत्या १८ डिसेंबरला निकाल देण्यात येणार आहे. भुजबळ यांच्याविरुद्ध महाराष्ट्र सदन बांधकाम घोटाळा आणि बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याबद्दल सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) खटला भरला आहे. त्याबद्दल त्यांना अटक झाल्यापासून ते तुरुंगातच आहेत. सर्वोच्च न्यायालयाने काळा पैसा प्रतिबंधक कायद्यातील (पीएमएलए) कलम ४५(१) रद्द केल्यापासून भुजबळ यांची जामिनावर सुटका होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे त्याचा आधार घेत त्यांनी 'ईडी' न्यायालयापुढे त्यांनी जामिनासाठी अर्ज केला. तथापि 'ईडी'तर्फे ॲड. हितेन वेणेगावकर यांनी त्याला तीव्र विरोध केला. उभय बाजूंचा युक्तिवाद पूर्ण झाल्याने 'ईडी'न्यायालयाचे न्या. एम. एस. आझमी यांनी १८ डिसेंबरला निकाल देण्याचे जाहीर केले आहे. पीएमएलए कायद्यातील कलम ४५(१) अ नुसार आरोपीने गुन्हा केलेला नसल्याची खात्री न्यायालयाला झाल्यास न्यायाधीश आरोपीला जामिनावर सोडू शकतात. मात्र जामिनावर सुटल्यावर आरोपीने गुन्ह्याची पुनरावृत्ती करू नये, असा निर्बंध न्यायालय आरोपीवर लादू शकते. भुजबळ हे मार्च २०१६ पासून तुरुंगात आहेत. ही अटक राजकीय षडयंत्र असल्याचा दावा भुजबळ यांच्यावतीने करण्यात आला.

पृष्ठ १ वरुन

## बोरिवली ते वसईचा प्रवास होणार जलद

वसई-विरारच्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पश्चिम दृतगती मार्गावरून प्रवास करावा लागतो. यामार्गावर आता मेट्रो-७ मार्गिकेचे काम सुरू असल्याने या मार्गावर प्रवास करताना प्रवाशांना खूपच त्रास सहनकरावा लागतो. या मार्गावर प्रवास करताना एक ते दीड तास लागतो. हा पाच किलोमीटर लांबीचा पुल झाल्यावर हा पुल नंतर मीरा- भाईंदर लिंक रोड आणि दहिसर लिंक रोडला जोडण्याचा विचार आहे.

हा पूल बनवण्यासाठी सर्व आवश्यक मंजुरी मिळाल्या आहेत. हा पूल बांधण्यासाठीच्या निविदा प्रक्रिया जानेवारी २०१८ साली काढण्यात येणार आहेत. ही निविद प्रक्रिया मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. यानंतर डिसेंबर २०१९ पर्यंत या पुलाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. मुंबईवरून विरारकडे जाण्यासाठीही हा मार्ग उपयुक्त ठरणार आहे. रेल, असे एमएमआरडीएच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या पुलामुळे वाहतूक कोंडीवरही उतारा मिळणार आहे.

## काँग्रेसमध्ये राहुलपर्वाचा आरंभ

सोनिया गांधी या गेल्या १९ वर्षे काँग्रेसच्या अध्यक्षपदी होत्या. काँग्रेसच्या इतिहासात प्रथमच एखाद्या व्यक्तीने इतक्या दीर्घकाळ पक्षाचे अध्यक्षपद भुषवले होते. मात्र, राहुल गांधी यांनी राजकारणात प्रवेश केल्यापासून त्यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रे कधी जाणार, याची चर्चा सातत्याने सुरू होती. मात्र, राहुल यांची राजकीय अपरिपक्वता, धरसोड वृत्ती, निवडणुकीच्या मैदानातील निराशाजनक कामगिरी यामुळे पक्षाध्यक्ष म्हणून त्यांचा राज्याभिषेकाचा मुहूर्त सातत्याने लांबणीवर पडत राहिला. लोकसभा निवडणुकांनंतर सोनिया गांधी यांनी प्रकृतीच्या कारणामुळे संघटनेच्या कामकाजापासून दूर राहू लागल्यानंतर पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी पुन्हा एकदा राहुल यांनी अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी आग्रह धरला होता.

## संपादकीय...

# बँकेतील ठेवी सुरक्षित आहेत का?




संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

बँकांच्या बाबतीत ही भीती जास्त निर्माण झालेली दिसते. एकतर आपत्कालीन परिस्थितीत ठेवीदारांची सगळी रक्कम जाणार किंवा ती अन्य स्त्रोतांमध्ये (वित्तविषयक उत्पादनांमध्ये) गुंतवून पाच टक्के एवढे व्याज ठेवीदाराला मिळणार, विषयीच्या तरतुदीविषयी प्रामुख्याने आक्षेप आहे. त्याचा विचार करण्यापूर्वी आधी या विधेयकाचे स्वरूप काय आहे, ते जाणून घेऊ. 'फायनान्शियल रिसोल्युशन अँड डिपॉझिट इन्शुरन्स बिल-२०१७' (एफआरडीआय) हे सध्या संसदेच्या स्थायी समितीपुढे विचारार्थ आहे. म्हणजेच त्याचे कायद्यात अद्याप रूपांतर झालेले नाही. आपल्या बँकेतील ठेवी सुरक्षित आहेत किंवा नाहीत, हा प्रत्येकाच्या काळजीचा विषय असणे स्वाभाविक आहे. सध्या संसदेत विचाराधीन असलेल्या एका विधेयकाविषयी सोशल मीडिया व अन्य माध्यमांतून जी चर्चा सुरू आहे, त्यामुळे तर हा प्रश्न लाखो लोकांच्या मनात निर्माण झाल्याचे दिसते. समजा एखादी बँक बुडत असेल तर तिला सावरण्यासाठी ठेवीदारांच्या ठेवींचा उपयोग करून घेतला जाणार; थोडक्यात बँकांच्या अपयशाचा बोजा ठेवीदाराच्या माथी मारला जाणार, अशा आशयाचे संदेश व्हायरल होत आहेत. नेमकी वस्तुस्थिती काय आहे, याचा विचार करणे त्यामुळेच आवश्यक आहे. बँकांच्या बाबतीत ही भीती जास्त निर्माण झालेली दिसते. एकतर आपत्कालीन परिस्थितीत ठेवीदारांची सगळी रक्कम जाणार किंवा ती अन्य स्त्रोतांमध्ये (वित्तविषयक उत्पादनांमध्ये) गुंतवून पाच टक्के एवढे व्याज ठेवीदाराला मिळणार, विषयीच्या तरतुदीविषयी प्रामुख्याने आक्षेप आहे. त्याचा विचार करण्यापूर्वी आधी या विधेयकाचे स्वरूप काय आहे, ते जाणून घेऊ. 'फायनान्शियल रिसोल्युशन अँड डिपॉझिट इन्शुरन्स बिल-२०१७' (एफआरडीआय) हे सध्या संसदेच्या स्थायी समितीपुढे विचारार्थ आहे. म्हणजेच त्याचे कायद्यात अद्याप रूपांतर झालेले नाही. बँका, विमा, बिगर बँकिंग वित्त सेवा कंपन्या यापैकी एखादी संस्था डबघाईला आली तर कोणती उपाययोजना करायची, याविषयीचे हे विधेयक आहे. त्यावरून वाद होण्याचे एक मुख्य कारण हे दिसते, की आपत्कालीन परिस्थितीत ठेवीदारांच्या किती मर्यादेपर्यंतची रक्कम विमासंरक्षित असेल, याविषयीच्या मर्यादेचा त्यात स्पष्ट उल्लेख नाही. तो विधेयकात करणे आवश्यक आहे, यात शंका नाही. परंतु सध्या ज्या प्रकारची भीती व्यक्त होत आहे, ती निश्चितच अवाजवी आणि काल्पनिक स्वरूपाची आहे, यात शंका नाही. 'बेल इन'विषयीची तरतूद समजावून घेणे आवश्यक आहे. 'बेल इन' ही 'बेल आउट'च्या बरोबर उलट अशी उपाययोजना आहे. एखादी बँक, विमा वा वित्तसंस्था बुडत आहे असे लक्षात आले तर कोणती तरी बाहेरची संस्था; प्रामुख्याने सरकार पुढे येऊन ती वाचविण्याचा प्रयत्न करते. संबंधित बँकेला भांडवल पुरविते. सरकार याचाच अर्थ या देशातील सर्वसामान्य करदात्यांच्या पैशातून हे काम केले जाते. आजवर सर्वसाधारणतः हीच पद्धत प्रचलित आहे. 'बेल इन' याचा अर्थ त्या संस्थेशी आर्थिकदृष्ट्या संबंधित ठेवीदार आणि गुंतवणूकदार यांच्यावर संस्था वाचविण्याची मुख्य भिस्त असेल. संस्थेला जे काही नुकसान झाले असेल ते बँकेच्या ग्राहकांनी सोसायचे असा याचा अथ. 'म्हणजेच त्यांनी ठेव म्हणून ठेवलेले सर्व पैसे त्यांना परत न मिळण्याचा धोका यांत अंतर्भूत आहे. येऊ घातलेल्या नव्या कायद्यातील सर्वाधिक वादग्रस्त तरतूद आहे ती हीच. यासंबंधीच्या आधीच्या कायद्यात केलेला हा मूलभूत बदल आहे. त्याचे विवेचन करण्यापूर्वी याच उद्दिष्टासाठीचा सध्याचा कायदा काय सांगतो, हे समजून घ्यायला हवे. सध्याच्या 'डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन अॅक्ट'नुसार ठेवीदारांची एक लाख रुपयांपर्यंतची रक्कम विमासंरक्षित असते. मात्र त्यापुढची नाही. उदाहरणार्थ, एखाद्याने वीस लाख रुपयांपर्यंतची ठेव बँकेत ठेवली असेल आणि दुर्दैवाने ती बँक बुडण्याची स्थिती निर्माण झाली तर एक लाख रुपये परत मिळण्याची हमी असते. त्यापुढची नाही. तीस वर्षापीर्वीचा हा कायदा आहे. मधल्या काळात महागाई वाढली. जीवनमानही उंचावले. तरीही ही मर्यादा वाढविण्यात आलेली नाही. याचाच अर्थ एक लाखांवरील रकमेबाबत जी गोष्ट पूर्वीपासून चालत आलेली आहे, त्यापेक्षा नवीन तरतूद फार काही वेगळे सांगत आहे, असे नाही. खरे म्हणजे जर आपण सध्याची परिस्थिती पाहिली, तर 'बेल-इन'च्या प्रश्नाच्या अनुषंगाने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यायला हवा. ग्राहक म्हणून तो लक्षात घेतला पाहिजे. सध्या तुम्ही जेव्हा बँकेत ठेवी ठेवता, तेव्हा तुम्ही बँकेचे 'सावकार' आहात, असे तुम्हाला वाटत नाही. याचे कारण तुम्ही ठेवत असलेल्या ठेवींना कसलीही सुरक्षितता बँकेकडून मिळत नाही. पण तत्त्वतः विचार करता आणि लेखाशास्त्राच्या (अकाउंटिंग) दृष्टीनेही तुम्ही बँकेचे 'सावकार' किंवा 'धनको' असता. सहसा आपण या नात्याच्या स्वरूपाचा विचार करीत नाही. अर्थात, सगळ्यांच्या दृष्टीने गाभ्याचा प्रश्न असा आहे, की आमच्या सध्याच्या ठेवींचे काय? त्या सुरक्षित राहणार की नाही? या बाबतीत अगदी स्पष्ट शब्दांत सांगायचे तर काळजी करण्याचे काहीही कारण नाही.

# व्यवहारात मराठी वापरासाठी शासनाला आली जाग

**शासनाच्या मराठी भाषा विभागाने टपाल कार्यालये, विमान, विमा, पेट्रोलियम कंपन्या, कर विभाग, दूरध्वनी, रेल्वे, मोनो-मेट्रो रेल्वे कंपन्यांनाही दैनंदिन व्यवहारासह पत्रव्यवहार, जनसंपर्क आदींसाठी मराठीवापराची सक्ती केली आहे. मनसेच्या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर हा निर्णय घाईत घेण्यात आला आहे.**

मराठी भाषा विभागाने केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्र आणि महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ आणि सुधारणा २०१५ ची आठवण मंगळवारी तातडीने काढलेल्या आदेशात करून दिली आहे. त्यानुसार जनतेशी करण्यात येणारा पत्रव्यवहार, मौखिक, दूरध्वनी अन्य माध्यमांद्वारे करण्यात येणाऱ्या संदेशवहनात, पाट्या, जाहिराती, सूचनाफलक, बँक दस्तावेज, रेल्वे, विमान, मेट्रो-मोनोचे आरक्षण अर्ज, तिकिटे, निवेदनात अन् ऑनलाईन-ऑफलाईन व्यवहारात मराठीचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कुसुमाग्रजांनी मराठी भाषा मंत्रालयाच्या दारात फाटक्या वस्त्रांत उभी आहे, अशा शब्दांत मराठी भाषेची शासनस्तरावर होत असलेली उपेक्षा अधोरेखित केली होती. असे हे शासन एकदम मराठी सक्तीची करण्याविषयी खडबडून जागे झाले.



यामागे मराठीप्रेम निश्चितच नसावे. हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर यासंदर्भात आंदोलनाचा इशारा देणाऱ्या मनसेवर राजकीय कुरघोडी करण्याचा सत्ताधाऱ्यांचा हेतू यामागे दिसतो. कारण याबाबतचा निर्णय याआधीच व्हायला हवा होता. कन्नड, मल्याळम, बंगाली भाषांच्या जतन-संवर्धनासाठी त्या भाषांचे शिक्षण संबंधित राज्यांतील शाळांमध्ये सक्तीचे करण्याचा निर्णय तेथील सरकारांनी घेतला. महाराष्ट्र सरकार मात्र याबाबतीत कोणताही ठोस निर्णय घेत नाही. तोपर्यंत असल्या दिखाऊ निर्णयांनी काहीही होणार नाही. दोन हजार वर्षे जुन्या असलेल्या आपल्या मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळायला अजूनही प्रतीक्षा करावी लागत आहे. आपल्याच राज्यातील दैनंदिन व्यवहार आणि पाट्या वगैरे मराठीत असाव्यात, यासाठी आंदोलने करून आपली राजकीय पोळी भाजण्याची पाळी काही पक्षांवर यावी, हेच दुर्दैवी आहे. राजभाषेसंदर्भातील आणि त्रिभाषा सूत्रासंदर्भात अधिनियम असतानाही शासनाच्या बोटचेप्या धोरणांमुळेच काही खासगी बँकांची मराठीतून व्यवहार करण्याकडे दुर्लक्ष करण्याची हिंमत होते. अन्यथा या अधिनियमांची आठवण वारंवार करून देण्याची वेळ शासनावर आली नसती. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा लवकरच मिळेल, अशा वल्गना करणारे सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे हे शिक्षणमंत्रीही आहेत. त्यांच्याच खात्याच्या माहितीनुसार मराठी शाळांची संख्या घटत असल्याची आकडेवारी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या मराठीला कुणी जपायचे, हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यात मराठी विद्यापीठ आणि महाराष्ट्र अनुवाद अकादमीची मागणी मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी सत्ताधाऱ्यांकडे केली आहे. त्याबाबतीत शासनस्तरावर तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. शासनाकडून ही अपेक्षा करीत असतानाच मराठी भाषिक म्हणून आपलीही काही कर्तव्ये आहेतच. ही सुरुवात घरापासून झाली पाहिजे. आप्तेष्टांशी, मित्रांशी, कार्यालयातील मराठी-अमराठी सहकाऱ्यांशी आपण मराठीतच बोलायला हवे.




# ग्राहकाला शक्ती कायद्याची!

**घरे व मालमत्ता खरेदी करणाऱ्या देशभरातील ग्राहकांचे हितरक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने आणलेला रिअल इस्टेट (नियमन आणि विकास) कायदा, २०१६ (रेरा) हा कायद्याच्या कसोटीवर टिकून राहिल्याने ग्राहकाची ताकद नक्कीच वाढली आहे. रेरा कायदा घटनात्मक तसेच कायदेशीरदृष्ट्या वैध आहे, यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठाने बुधवारी केलेले शिक्कामोर्तब ऐतिहासिक म्हणायला हवे. कारण, ग्राहक आणि बिल्डर यांच्या दरम्यान होणाऱ्या या व्यवहारात नेहमीच बिल्डरची बाजू अधिक वजनदार असायची आणि ग्राहकाच्या फरफटीला अंत नसायचा.**

रेरा कायद्यामुळे हे चित्र मोठ्या प्रमाणात पालटणार हे दिसत होते. तसे ते बदलू लागल्यानंतर त्याचा लाभ ग्राहकाला व्हायला लागला आणि मनमानीपणा करणाऱ्या लबाड बिल्डरांना चाप बसू लागला. म्हणूनच हा निवडा महत्वपूर्ण ठरतो. सदर कायदा घटनात्मक तसेच कायदेशीर चौकटीत बसत नसल्याचे सांगत अनेक बिल्डर कंपन्यांनी अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन या कायद्यातील विविध तरतुदींना आव्हान देण्याचा प्रयत्न केला. त्यात ते अपयशी ठरल्याने ग्राहक आणि या कायद्याची अंमलबजावणी करणारे केंद्र व राज्य सरकार यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक बड्या बिल्डर कंपन्यांनी रेरा कायद्यातील बऱ्याच तरतुदी घटनाबाह्य असल्याचा दावा करत उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्या होत्या. त्यानंतर या कायद्याला आव्हान देणाऱ्या देशभरातील सर्व याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घ्यावी, असे विनंती अर्ज सर्वोच्च न्यायालयात करण्यात आले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना विनंती करून या विषयावर विशेष खंडपीठाची स्थापना करून दोन महिन्यांत निवाडा देण्यास सांगितले. त्यानुसार, न्या. नरेश पाटील व न्या. राजेश केतकर यांचे खंडपीठ स्थापन करण्यात आले. बिल्डर कंपन्यांनी आव्हान दिलेल्या या कायद्यातील अनेक कलमे आणि पोटकलमांतील तरतुदींवर याचिकादार असलेल्या केंद्र सरकार, राज्य सरकार, महारेरा यांच्या वकिलांनी युक्तिवाद केले. त्यात 'अॅमिकस क्युरी' अर्थात न्यायमित्र म्हणून नेमण्यात आलेले अॅड. दरायस खंबाटा यांचाही युक्तिवाद ऐकल्यानंतर केवळ एक पोटकलम वगळता अन्य सर्व तरतुदी घटनात्मक असल्याचा निर्वाळा खंडपीठाने दिला. या पहिल्या निर्णायक विजयानंतर सदर कायद्याची अंमलबजावणी अधिक व्यापक आणि परिणामकारक होईल, असे मानायला हरकत नाही. रेरा कायद्याशी निगडीत देशभरातील हा पहिलाच निकाल असल्याने तो अन्य सगळ्याच प्रकरणांसाठी संदर्भ आणि निर्णायक ठरेल. 'हा कायदा गृहनिर्माण व मालमत्ता उद्योगात शिस्त व व्यावसायिकता निर्माण करण्याबरोबरच ग्राहकांचे हित जपणारा आहे', हा केंद्र सरकारचा युक्तिवाद खंडपीठाने ग्राह्य धरला ही महत्वाची बाब अधोरेखित करायला हवी.

# सर्वसामान्यांची 'टोइंग'ने फरफट



**ठाणे - वाहतूक शाखेच्या टोइंग व्हॅनवरील कर्मचारी आणि पोलिसांच्या अरेरावीमुळे सर्वसामान्य ठाणेकर हैराण झाले असताना याच कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी असंवेदनशीलतेचा कहर केला. नो पार्किंगमध्ये उभ्या केलेल्या स्कूटरवर पोलिस कारवाई करत असल्याचे लक्षात आल्यानंतर हाती पाच वर्षाचे मूल असलेली महिला धावत आली. नियमानुसार दंडात्मक रक्कम घेणे अपेक्षित होते. मात्र, लेकुरवाळ्या महिलेशी हुज्जत घालून तिचे लायसन्स जप्त करण्यात आले.**

तिच्या हातातील मूल भेदरून रडतेय, याचाही विचार करण्यात आला नाही. विशेष म्हणजे ही कारवाई एका महिला पोलिस हवादाराने केली आहे. ठाणे महापालिका मुख्यालयासमोर या महिलेने काही कामानिमित्त आपली स्कूटर उभी केली होती. या रस्त्यावर अनेक चार चाकी वाहने उभी असल्यामुळे इथे 'नो पार्किंग' असेल याचे भान त्या महिलेला नव्हते. काही कामानिमित्त ती महिला समोरच्या बाजूस गेली असताना वाहतूक पोलिसांनी थेट त्यांच्यासमोरूनच स्कूटर उचलून नेण्यास सुरुवात केली. यावेळी या महिलेने आक्षेप घेतला. मी इथेच होते, नो पार्किंग आहे मला कळले नाही. दंड भरते, परंतु गाडी उचलू नका अशी विनवणी ती महिला करत होती. मात्र, गाडीत बसलेल्या महिला पोलिस कर्मचाऱ्याने तिच्याशी हुज्जत घातली. हा सारा प्रकार बघून तिच्यासोबत असलेल्या लहान मुलाला रडू कोसळले. मुलाला सांभाळू की गाडीवरील कारवाई टाळण्याचा प्रयत्न करू, या विचारात ती महिलाही रडवेली झाली होती. पोलिस गाडी उचलून नेण्यावर आग्रही असताना घटनास्थळी असलेल्या काही पत्रकारांनी कारवाईवर आक्षेप नोंदविला. त्यानंतर काहीशा नरमलेल्या महिला हवालदाराने स्कूटर सोडली. मात्र, त्या महिलेचा परवाना जप्त करून व्हॅन निघून गेली. या प्रकरणी ठाणे वाहतूक शाखेचे पोलिस काहीही बोलण्यास तयार नाही.

ठाणे महापालिका मुख्यालयासमोरील रस्ता नो पार्किंग झोन म्हणून जाहर करण्यात आला आहे. तिथे सर्वत्र नो पार्किंगचे फलकही आहेत. मात्र, त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला कायम पालिकेतील नगरसेवक, कंत्राटदार, अधिकारी आणि अन्य नेतेमंडळींच्या मोठमोठ्या गाड्या उभ्या असतात. त्या वाहनांवर कारवाई करण्याची धमक वाहतूक पोलिस कधीच दाखवत नाहीत.

# खासगी बसचे परवाने संकटात

**ठाणे-** ठाणे पूर्व रेल्वे स्थानक ते कासारवडवली या मार्गावर बेकायदा धावणाऱ्या खासगी बसगाड्यांचे परवाने रद्द करण्याचे कोणतेही अधिकार नसल्यामुळे वाहतूक पोलीस केवळ दंडात्मक कारवाई करीत आहेत. मात्र, या कारवाईनंतरही खासगी बसगाड्यांचा गोरखधंदा शहरात सुरू असल्याचे वाहतूक पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी आता दोनपेक्षा अधिक वेळा दंडात्मक कारवाई करण्यात आलेल्या बसगाड्यांच्या क्रमांकाची यादी ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाला पाठवून त्यांचे परवाने रद्द करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे या बसगाड्यांच्या मालकांवर संक्रात ओढावण्याची चिन्हे आहेत.

ठाणे शहर आणि घोडबंदर या भागातील महामार्गावर गेल्या काही वर्षांपासून खासगी बसगाड्यांमधून प्रवाशांची बेकायदा वाहतूक सुरू आहे. या बसगाड्या ठाणे पूर्व



स्थानक ते कासारवडवली या मार्गावर चालविण्यात येतात. या बस वाहतुकीमुळे ठाणे पूर्व (कोपरी) भागात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली होती. त्यामुळे कोपरीतील रहिवाशांनी आंदोलन उभारत खासगी बसगाड्यांना कोपरीत प्रवेश बंद करण्याची मागणी केली होती. त्यानंतर ठाणे वाहतूक पोलिसांनी खासगी बसगाड्यांना कोपरीत प्रवेश बंद केला होता. या प्रवेश बंदीनंतर खासगी बस वाहतूक ठाणे पश्चिमेतील नौपाडा तसेच जांभळी नाका भागातून सुरू झाली होती. या मुद्यावरून वाहतूक पोलीस आणि ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या कारभारावर टीका होऊ लागली होती. या टीकेनंतर वाहतूक पोलिसांनी खासगी बसगाड्यांविरोधात सातत्याने कारवाई सुरू केली आहे. परंतु या बसगाड्यांचे परवाने रद्द करण्याचे अधिकार नसल्यामुळे वाहतूक पोलीस केवळ दंडात्मक कारवाई करत आहेत.

# ३ फेब्रुवारीपर्यंत रेतीउत्खननास बंदी




**पालघर-** पश्चिम रेल्वेवरील रेल्वेपूल क्र. ९२ व ९३ च्या कार्यक्षेत्रामध्ये व त्यांच्या पोहोच मार्गातील पुलाचे महत्त्व व रेल्वे पुलाला धोका पोहोचू नये, यासाठी रेती उत्खनन व नौकायनास ३ फेब्रुवारीपर्यंत बंदी घालण्यात आली आहे. सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि मार्ग, पूल, खदंक, धरणे आणि त्यांच्या वरील किंवा त्यांच्या बाजूंची कुंपणे आणि पूर्ण भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदराचा व खाड्यांचा नाले, सरोवर व तळी आणि सर्व कालवे व पाण्याचे पाट आणि सर्व पाणी इत्यादी वर राज्य सरकारचा मालकी हक्क असल्याने रेल्वेपूल कार्यक्षेत्रातील रस्त्याचा वापर रेती वाहतुकीसाठी प्रतिबंधित केला आहे. पालघरच्या पोलिस अधिक्षकांनी वैतरणा नदीवरील रेल्वे पूल व अन्य पुलाच्या ६०० मीटर कार्यक्षेत्रात २४ तास पोलिस गस्त ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, पुलाच्या दोन्ही बाजूंना ६०० मीटर (दोन हजार फूट)च्या क्षेत्रात रेती उत्खननास परवानगी देण्यात आलेली नाही. वैतरणा नदीवरील रेल्वेपुलाच्या दोन्ही बाजूस ६०० मीटर कार्यक्षेत्रात ७ डिसेंबरपासून ते ३ फेब्रुवारीपर्यंत पोलिस, महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड, नौदल, मत्स्य व्यवसाय, वन, कोस्ट गार्ड, उत्पादन शुल्क इत्यादी सरकारी विभाग वगळून अन्य व्यक्तींना वैतरणा नदीवरील रेल्वेपुलाच्या दोन्ही बाजूंना जिल्हाधिकारी तथा पालघर जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय नौकानयन मार्गाचा वापर करण्यास मनाई केली आहे.

# नालासोपाऱ्यात ११ बांगलादेशींना अटक

**वसई-** दहशतवाद विरोधी पथकाने नालासोपारा येथे बुधवारी छापा टाकून बेकायदा राहणाऱ्या ११ बांगलादेशी नागरिकांना अटक केली. नालासोपाऱ्याच्या अनेक भागांत बांगलादेशी नागरिक छुप्या पद्धतीने राहत असल्याचा संशय आहे. मुंबई दहशतवादविरोधी पथकाच्या कारवाईनंतर स्थानिक पोलिसांनीही बांगलादेशी नागरिकांविरोधात मोहीम उघडली आहे. नालासोपारा पश्चिमेतील टाकी पाडा, गास रोड येथे बुधवारी विक्रोळीच्या दहशतवादविरोधी पथकाने छापा टाकून या बांगलादेशी नागरिकांना अटक केली. या बांगलादेशी नागरिकांकडे बनावट पॅनकार्ड आणि आधारकार्ड असल्याचे समोर आले आहे. एजंटच्या माध्यमातून त्यांनी ही कागदपत्रे बनवली होती. या कारवाईबाबत स्थानिक पोलिसांना अंधारात ठेवण्यात आले होते. या कारवाईनंतर गुरुवारी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक झाली आणि त्यांनी नालासोपारा शहरात बांगलादेशी नागरिकांना शोधण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन सुरू करण्याचा निर्णय घेतला. 'परदेशी नागरिकांना शोधून त्यांना त्यांच्या देशात पाठवण्याची एमआरओ अर्थात फॉरन रजिस्ट्रेशन शाखा जिल्ह्यात कार्यरत आहे. या शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने बांगलादेशी शोधून काढले जाणार आहे.

# उल्हास नदीचे पाणी 'दूषितच'

**बदलापूर-** उल्हास आणि वालधुनी नदीतील प्रदूषणाविषयी स्थानिक स्वराज्य संस्थांना फटकारल्यानंतरही उल्हास नदीच्या पाण्याचा दर्जा सुधारल्याचे दिसत नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नोव्हेंबर महिन्यात प्रदूषण नियंत्रण मंडळाला याबाबत अवगत केले असून त्यात नदीचे पाणी प्रदूषित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. माहितीच्या अधिकारातून ही बाब उघड झाली आहे. उल्हास नदी पात्रातून जिल्ह्यातील विविध शहरांना पाण्याचा पुरवठा होत असतो. त्यामुळे नदीतील हे प्रदूषण रोखले नाही, तर संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती आहे. उल्हास आणि वालधुनी नदी प्रदूषणप्रश्नी राष्ट्रीय हरित लवाद आणि सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य शासनाला फटकारल्यानंतर आता नद्या वाचवण्यासाठी १०० कोटी देण्याचे राज्य शासनाने मान्य केले आहे. मात्र त्यानंतरही सुधारणा झाली



नसल्याचे चित्र आहे. त्यात माहिती अधिकारात उल्हास नदीतील पाण्याच्या दर्जाविषयी धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. या बाबी कोणत्याही सामाजिक संस्थेने नव्हे तर महाराष्ट्र औद्योगिकविकास महामंडळाच्या पत्रातून समोर आल्या आहेत हे विशेष. बदलापूर ते ठाणे पट्ट्यातील विविध औद्योगिक वसाहती आणि निवासी वस्त्यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पाण्यावर प्रक्रिया करून पिण्यायोग्य पाणीपुरवठा करत असते.


# घोडबंदरच्या कोंडीकडे रस्ते महामंडळाचे दुर्लक्ष



**ठाणे-** घोडबंदर मार्गावरील अवजड वाहतूक डाव्या बाजूने सुरू राहावी आणि वाहतूककोंडीची समस्या सुटावी यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वाहतूक नियमांसंबंधीचे फलक लावावेत आणि मार्गिकापट्ट्या अधोरेखित कराव्यात, अशी सूचना ठाणे वाहतूक पोलिसांनी केली आहे, मात्र एमएसआरडीसीने या सूचनांकडे दुर्लक्ष केले आहे, असे वाहतूक पोलिसांचे म्हणणे आहे. दरम्यान, एमएसआरडीसीनेही वाहतूक पोलिसांकडून असे पत्र आल्याचे मान्य केले आहे. घोडबंदर मार्गावर ट्रक आणि अवजड वाहने मनमानी पद्धतीने चालवली जातात. अवजड वाहने महामार्गाच्या डाव्या बाजूने चालवण्यात यावीत, हा नियम चालकांकडून पायदळी तुडविला जातो. त्यामुळे या मार्गावर वारंवार कोंडी होते. याला महामार्गाचे कामकाज पाहणारी यंत्रणा जबाबदार असल्याचा दावा वाहतूक विभागाकडून करण्यात आला आहे. ट्रक आणि अवजड वाहनांच्या चालकांनी महामार्गावर डाव्या बाजूने वाहने चालवावीत. तसेच उजव्या आणि मधल्या मार्गिकेवरून कार आणि इतर वाहने चालविण्यात यावीत अशा सूचनेचे फलक लावण्याची मागणी वाहतूक पोलिसांनी एमएसआरडीसीकडे अनेकदा पत्राद्वारे केली आहे. मात्र, या विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे, असे वाहतूक पोलिसांचे म्हणणे आहे. अवजड वाहनांच्या चालकांना डाव्या बाजूने वाहने नेण्यास सांगण्यात येते.

# सामान्य माणसाच्या पैशांवर किती हात मारायचा याची मर्यादा राज्यकर्त्यांनी पाळायची असते

**मुंबई - सरकारचा कारभार जनतेच्या पैशावर चालतो हे खरे असले तरी सामान्य माणसाच्या पैशांवर किती हात मारायचा याची मर्यादा राज्यकर्त्यांनी पाळायची असते. या मर्यादांच्या चौकटीतच सरकारने आपल्या उत्पन्नाचे स्रोत वाढवायचे असतात. हल्ली मात्र जमेल तेथून, मिळेल तेवढे सरकारचे उत्पन्न वाढविण्याचा एककलमी कार्यक्रम सुरू आहे की काय, अशी शंका प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांमुळे येते असं शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. सामना संपादकीयच्या माध्यमातून त्यांनी सरकारवर टीका केली आहे.**



आता अशीच एक बातमी बँकेतील ठेवींसंदर्भात प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार बँकेत ठेवलेल्या ठेवीचे पैसे मुदतीनंतर परत मागणाऱ्या ठेवीदाराच्या हातात बँक कदाचित अर्धीच रक्कम ठेवू शकते. हे चित्र सरसकट सर्वच बँकांमध्ये दिसेल असे नाही, पण बुडणाऱ्या किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल झालेल्या बँकांमध्ये दिसू शकते. बुडणाऱ्या बँकेला त्या बँकेच्या ठेवीदारांनीही हातभार लावावा असा एक हेतू या धोरणामागे असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र हा 'आजार एकाला आणि शस्त्रक्रिया दुसऱ्याचीच' अशातला प्रकार म्हणावा लागेल. बँक आर्थिक डबघाईला येण्यात दोष बँकचालकांचा असणार. त्याच्याशी ठेवीदारांचा काहीही संबंध नसणार. तरीही ठेवीदारांनी ठेव म्हणून ठेवलेल्या त्यांच्या कष्टाच्या पैशातील काही रकमेवर पाणी सोडायचे हे कोणते तर्कशास्त्र? असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला आहे. 'आर्थिक सुरक्षा आणि ठेव विमा विधेयक' म्हणजेच 'फायनान्शिअल रिझोल्युशन ॲण्ड डिपॉझिट इन्शुरन्स' असे हे विधेयक असून ते सध्या संसदेच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले आहे. बँक ग्राहकांच्या, ठेवीदारांच्या हिताचे पूर्णपणे संरक्षण केले जाईल असे सरकारकडून ठामपणे सांगण्यात येत आहे. शिवाय सध्याच्या कायद्यानुसारही बँक ठेवीच्या रकमेपैकी एक लाख रुपये एवढ्याच रकमेला विमा संरक्षण मिळते. त्यामुळे त्यापुढील ठेवीची रक्कम तशी 'असंरक्षित' ठरते, असा युक्तिवाद होऊ शकतो. मात्र याचा अर्थ ठेवीदाराच्या स्वतःच्या पैशांच्या हक्कावर, अधिकारांवर गदा यावी, बंधने यावीत असा होत नाही असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. पुन्हा नव्या प्रस्थापित विधेयकात हे विमा संरक्षण नेमके किती रकमेला असेल याचीही स्पष्ट माहिती होत नसल्याने जनतेमध्ये संभ्रम होणे स्वाभाविकच आहे. त्यात खिशाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कात्री लागण्याचे अनेक प्रयोग होत असल्याने ठेवीच्या रकमेवरही 'संक्रांत' येते की काय, अशी शंका सामान्य जनतेला येऊ शकते. तिचे नीट निरसन करण्याचे, ती फोल ठरविण्याचे काम सरकारने केले पाहिजे असं मत उद्धव ठाकरेंनी व्यक्त केलं आहे.

## 'हल्ल्याची भीती; पाकिस्तानात जायचं टाळा'

**वॉशिंग्टन-** पाकिस्तानात वाढत जाणारे अतिरेकी हल्ले आणि हिंसेचा जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेनेही धसका घेतला आहे. पाकिस्तानात तुमच्या जीवाला



अतिरेक्यांकडून धोका आहे. गरज नसताना पाकिस्तानात जाऊ नका, अशा सूचनाच अमेरिका आणि चीनने त्यांच्या देशांतील नागरिकांना दिल्या आहेत. पाकिस्तानमध्ये होणाऱ्या संभावित दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि चीनने या सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.

सर्व दक्षिण आशियायी देशात गरज नसताना प्रवास करू नका, असंही अमेरिकेच्या विदेश मंत्रालयाने म्हटलं आहे. यापूर्वी २२ मे रोजी अमेरिकेने अशाच सूचना त्यांच्या नागरिकांना दिल्या होत्या, त्यानंतर आता सहा महिन्याने अमेरिकेने पुन्हा या सूचना जारी केल्या आहेत. पाकिस्तानात सातत्याने कट्टरपंथीयांचे हल्ले होत आहेत. सरकारी अधिकारी, मानवाधिकार कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते आणि आदिवासींवर पाकिस्तानात होणारे हल्ले ही सर्वसामान्य बाब झाली असल्याचं अमेरिकेने दिलेल्या सूचनेत म्हटलं आहे.

## 'झोपु' योजनेतील घर मुदतपूर्व विकता येणार?

### 'एसआरए' घरविक्रीची अट शिथिल? १० वर्षाआधीच घर विकण्यास मुभा मिळण्याची चिन्हे

**मुंबई-** सरकार रोज एक नविन योजना, नविन कायदा नविन विषय घेऊन, काहीतरी चॉकलेट दाखवत असते, खरं तर एस आर ए मधे निर्णय काहीच होत नाही फक्त योजनांचा पाऊस मात्र पडतच चाललाय. मा. श्री सीईओ विश्वास पाटील साहेबांच्या निवुत्ती च्या काळात २८\७\२०१७ या तारखेला बांन्द्राला झालेल्या झोपडपट्टीधारकांच्या हिताच एक ही काम. मुंबईतील संक्रमण शिबिरांतील घुसखोरांना घरे देण्यासाठी एकीकडे कायद्यात बदल करण्याच्या हालचाली सुरू असताना, दुसरीकडे एसआरए इमारतींमधील घरांची दहा वर्षे पूर्ण होण्याच्या आधीच केलेल्या विक्री व्यवहारांनाही मान्यता मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे एसआरए इमारतींमध्ये घर विकत घेतलेल्या आणि घर विकण्याच्या प्रयत्नात असलेल्या असंख्य रहिवाशांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. दंडात्मक कारवाई करून ही घरे अधिकृत करण्यासाठी राज्य सरकारने उपसमिती नेमली असून, यावर सकारात्मक निर्णय होण्याचा विश्वास 'एसआरए'तील सूत्रांनी व्यक्त केला आहे. झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत बांधलेल्या इमारतींमधील घरे नियमानुसार दहा वर्षांच्या आत विकता येत नाहीत. या प्रकल्पातील रहिवाशांना सुमारे २६९ चौरस फुटांची घरे मोफत मिळतात. पण कुटुंब वाढल्यामुळे अनेकांना




ही जागा अपुरी पडते. दोन-तीन भावांचे कुटुंब असल्यास घरात भांडणे होतात. त्यामुळे एसआरए प्रकल्पाअंतर्गत मिळालेली घरे विकून येणाऱ्या पैशातून भावांसाठी वेगवेगळी घरे घेऊन कौटुंबिक वाद संपुष्टात आणण्याचा प्रयत्न होतो. पण या व्यवहारांसाठी अनेक कल्पना लढवल्या जातात. या खरेदी-विक्रीच्या व्यवहाराच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. त्यावर सुनावणी करताना, दहा वर्षांच्या आत घरांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने 'एसआरए'ला दिले होते. त्यानंतर 'एसआरए'ने काही रहिवाशांना घरे रिकामी करण्याच्या नोटिसा दिल्या. यावर काही रहिवाशांनी न्यायालयात धाव घेतली होती, तर काही रहिवाशांनी राज्य सरकारला साकडे घालून यामध्ये हस्तक्षेप करण्याची विनंती केली होती.

राज्य सरकारने संक्रमण शिबिरातील घुसखोरांच्या विषयावर मार्ग काढण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमली आहे. उपसमितीवर 'एसआरए'च्या इमारतींमधील दहा वर्षांच्या आतील खरेदी-विक्रीच्या व्यवहारांबाबतही निर्णय घेण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या समितीत गृहनिर्माणमंत्री प्रकाश मेहता, राज्यमंत्री रवींद्र वायकर यांचा समावेश आहे. मुंबईत १ लाख ९० हजारांपेक्षा अधिक घरे एसआरए योजनेअंतर्गत झोपडपट्टीधारकांना दिल्या आहेत.

## बोगस जात पडताळणीचे रॅकेट

**पुणे- इंजिनीअरिंगला प्रवेश घेताना जात पडताळणी प्रमाणपत्र घेण्यासाठी मदन (नाव बदलले आहे) समितीच्या कार्यालयात जातो. आवश्यक सर्व पुरावे, कागदपत्रे उपलब्ध असली, तरी विलंब टाळण्यासाठी तो एका बाहेरील व्यक्तीमार्फत प्रमाणपत्र मिळवितो; पण प्रत्यक्ष पडताळणी होते, तेव्हा ते प्रमाणपत्र बनावट असल्याचे समोर येते आणि प्रवेश रद्द होऊन गुन्हा दाखल होण्याची टांगती तलवार त्याच्या डोक्यावर येते!**

पुण्याच्या जात पडताळणीच्या कार्यालयात हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, अशा प्रकारे बनावट जात प्रमाणपत्र देणाऱ्या टोळ्या राज्यभरात सक्रिय झाल्याची भीती खुद्द सामाजिक न्याय विभागातील अधिकाऱ्यांकडूनच व्यक्त होत आहे. या टोळ्यांच्या कारवायांना राज्यातील शेकडो विद्यार्थी बळी पडत असून, पात्र असलेल्यांनाही फटका बसल्याचे आढळले आहे.

इंजिनीअरिंग, मेडिकल आणि अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांना



प्रवेशासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. संबंधित महाविद्यालयांकडून या प्रमाणपत्रांची संबंधित जिल्ह्यांच्या समित्यांकडून पुन्हा पडताळणी केली जाते. मात्र, या वर्षात विविध कॉलेजातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांपैकी अनेक प्रमाणपत्रे बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रमाणपत्रांची तपासणी केली असता ती अधिकृत प्रमाणपत्रांचीच नक्कल केल्याचे आढळून आले आहे. मात्र, काही गोपनीय खुणा त्यावर नसल्याने त्यांचा बनाव उघड झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, अशा बनावट पडताळणी प्रमाणपत्रांची तब्बल तीस हजार रुपयांपर्यंत विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. पुण्यातील महाविद्यालयांमध्ये राज्यभरातून विद्यार्थी येतात. त्यामुळे विविध जिल्ह्यांमधील प्रमाणपत्रांची तपासणी केली असता, अनेक जिल्ह्यांमध्ये या बनावट प्रमाणपत्रांचा सुळसुळाट झाल्याचे आढळून आले आहे.

## पॅनकार्ड- आधार लिंक करण्यासाठी मुदतवाढ

**नवी दिल्ली-** विविध सरकारी योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान आणि विविध सेवा यांना 'आधार'शी जोडण्यासाठी मुदतवाढ दिल्यानंतर आता केंद्रीय अर्थ खात्याने आधार – पॅन कार्ड लिंक करण्यासाठी मुदत वाढवून दिली आहे. आता ३१ मार्च २०१८ पर्यंत आधार – पॅन कार्ड लिंक करता येणार आहे. केंद्र सरकारने पॅन कार्ड – आधार लिंक करणे बंधनकारक केले आहे. यासाठी ३१ डिसेंबर



२०१७ ही अंतिम तारीख होती. मात्र, अजूनही असंख्य पॅन कार्ड धारकांना 'आधार'शी लिंक करताना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे अर्थ मंत्रालयाने शुक्रवारी मुदतवाढीचा निर्णय घेतला. आता ३१ मार्च २०१८ रोजी पर्यंत आधार – पॅन कार्ड लिंक करता येणार आहे. दरम्यान, प्रत्येक बँक खाते हे आधार क्रमांकाशी संलग्न करण्याची अंतिम मुदत काही दिवसांवर येऊन ठेपली असताना, देशातील ५० टक्के खात्यांनाच आधार संलग्नता असल्याची माहिती पुढे आली आहे. बँक खाते क्रमांक आणि आधार क्रमांक लिंक करण्यासाठी ३१ डिसेंबर २०१७ ही अंतिम मुदत आहे. त्यामुळे याबाबत आता काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गुरुवारी केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात महत्त्वाची माहिती दिली होती. विविध सरकारी योजनांअंतर्गत मिळणारे अनुदान, विविध सेवा यांना आधारशी जोडण्यासाठी ३१ मार्च २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याची तयारी दर्शवली होती.

## 'सीडी'च्या नादात भाजपला जाहीरनाम्याचा विसर



**अहमदाबाद-** हार्दिक पटेल यांचे महिलेसोबतचे व्हिडिओ समोर येत असतानाच शुक्रवारी हार्दिक पटेलने ट्विटरच्या माध्यमातून भाजपला चिमटा काढला आहे. सीडीच्या नादात भाजपला जाहीरनाम्याचा विसर पडल्याचा टोला त्यांनी लगावला.

गुजरात विधानसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्यातील मतदान शनिवारी होणार आहे. पहिल्या टप्प्यात ८९ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. मात्र, अद्याप भाजपने जाहीरनामा प्रकाशित केलेला नाही. या पार्श्वभूमीवर हार्दिक पटेलने ट्विटरच्या माध्यमातून भाजपवर निशाणा साधला. गुजरातमध्ये विकासासोबत जाहीरनामाही हरवला आहे. तुम्हाला कोणीही काही बोलणार नाही, तुम्ही तुमच्या शैलीत जाहीरनामा सादर करा, असे त्यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे. सीडीच्या नादात भाजपला जाहीरनाम्याचा विसर पडला, असा टोला त्यांनी लगावला.

गुजरातमध्ये सध्या धर्मावरही आचारसंहिता लागू झाली आहे. सुरतमध्ये रामकथेसाठी जात असताना पोलिसांनी अडवले, असा आरोपही त्यांनी केला. पंतप्रधानांविषयी अपशब्द वापरणाऱ्या नेत्याला काँग्रेसने तडकाफडकी निलंबित केले. पण पंतप्रधान जेव्हा मुख्यमंत्री होते, त्यावेळी ते भारताच्या सुनेला बारगर्ल म्हणायचे, ते योग्य होते का, असा सवालही त्यांनी विचारला आहे.

## अवैध संबंधात केवळ पुरुषच दोषी का?

**नवी दिल्ली-** लग्नानंतर अवैध संबंध ठेवण्यासंबंधीच्या कायद्याला असंविधानिक ठरविण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. अवैध संबंधाबाबतच्या कायद्यात पुरुषांशी भेदभाव करण्यात आला आहे. एखाद्या पुरुषाने एखाद्या स्त्री सोबत तिच्या संमतीने संबंध ठेवले तर त्या स्त्रीचा पती त्या पुरुषाविरोधात व्याभिचाराची केस दाखल करू शकतो. मात्र संबंधित महिलेवर गुन्हा दाखल करण्याची कायद्यात तरतूद नसल्याने हा पुरुषांसोबत झालेला भेदभाव असून या कायद्याला असंविधानिक घोषित करण्यात यावे, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. याचिकाकर्त्याचे वकील के. राज यांनी या प्रकरणात केंद्रीय गृह मंत्रालयाला प्रतिवादी केले आहे. अवैध संबंधाशी संबंधित कलम ४९७ मध्ये संविधानिक तरतुदींचं उल्लंघन करण्यात आलं आहे. स्त्री आणि पुरुष सहमतीने शरीर संबंध ठेवत असतील तर त्यातून महिलेला सुट कशी काय मिळू शकते? असा सवाल या याचिकेत करण्यात



आला आहे. संविधानाच्या अनुच्छेद १४ मध्ये समानतेचा तर अनुच्छेद १५ आणि २१ मध्ये जीवनाच्या अधिकाराचा समावेश असून कलम ४९७ मध्ये नेमकं त्याचंच उल्लंघन झालेलं दिसतं, असंही याचिकेत म्हटलं आहे. हा कायदा एकप्रकारे महिलांच्या विरोधात विरोधात आहे. यात महिलांना पतीची खाजगी मालमत्ता समजण्यात आलं आहे. जर परपुरुषाशी अवैध संबंध ठेवायला पतीची संमती असेल तर गुन्हा ठरत नाही. कायद्यातील ही तरतूद भेदभाव करणारी असून लैंगिक असमानतेच्या (जेंडर जस्टीसच्या) विरोधातील आहे.

या तरतुदीमुळे समानतेच्या अधिकारावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळेच भारतीय दंड संविधानातील हे कलम अवैध, मनमानी करणारं आणि असंविधानिक असल्याचं घोषित केलं पाहिजे अशी विनंती या याचिकेत करण्यात आली आहे.

## पंजाबमधून 'आयएसआय'च्या एजंटला अटक

### लष्कराची माहिती पाकिस्तानला पुरवल्याचा आरोप

**बटाला (पंजाब)-** पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय'साठी काम करणाऱ्या एका संशयीत व्यक्तीला पंजाब पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुरुमुख सिंह असे या संशयीताचे नाव असून तो 'आयएसआय'च्या संपर्कात असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. पुरियान खूराद या गावाजवळ सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. भारतीय लष्कराची माहिती पाकिस्तानाला पुरवल्याचा आरोपही त्याच्यावर आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, संशयीत 'आयएसआय' एजंट असलेला गुरुमुख सिंह हा भारतीय असून तो पाकिस्तानात जाऊन आला आहे. पाकिस्तानात गेल्यानंतर त्याने




तेथील गुप्तचर यंत्रणांनी संपर्क साधला होता. भारतीय लष्कराची सुरक्षा विषयक महत्वाची माहिती त्याने पाकिस्तानला पुरवल्याचा संशयही पोलिसांनी व्यक्त केला आहे. बटालाचे पोलीस अधीक्षक इंद्रजीत सिंह गुहमन यांनी सांगितले की, गुरुमुख कंटरपंथी शीख समुहाबरोबर पाकिस्तानच्या दौऱ्यावर गेला होता. तेथे त्याने 'आयएसआय' शी संपर्क साधला, त्यानंतर तेथे त्याला भारतीय लष्काराबाबत महिती गोळा करण्यास सांगण्यात आले होते.

पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय' ही नेहमीच भारताच्या कुरापती काढण्यात व्यस्त असते. भारतात अराजकता माजवण्यासाठी 'आयएसआय' नेहमीच प्रयत्नशील राहिली आहे.

## डेबिट कार्डवरील शुल्क कमी होणार?

**नवी दिल्ली-** रिझर्व्ह बँकेकडून डेबिट कार्डच्या वापरावरील शुल्कात घट केली जाऊ शकते. डेबिट कार्डच्या वापरावरील शुल्कात तर्कसंगत बदल करण्यात येणार असल्याची माहिती रिझर्व्ह बँकेने दिली आहे. कॅशलेस व्यवहारांना चालना देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. रिझर्व्ह बँकेने द्वैमासिक पतधोरण जाहीर करताना याबद्दलची माहिती दिली. गेल्या काही महिन्यांमध्ये डेबिट कार्डने होणाऱ्या व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली आहे. मात्र यामध्ये आणखी वाढ करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यामुळेच डेबिट कार्डच्या वापराला आणखी प्रोत्साहन देण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न आहे. डेबिट कार्डच्या वापरावर द्यावे लागणारे शुल्क कमी केले जाईल किंवा ते रद्द करण्यात येईल, असे रिझर्व्ह बँकेने द्वैमासिक पतधोरण जाहीर करताना म्हटले. याबद्दल विचारविनिमय सुरु असल्याचे रिझर्व्ह बँकेकडून सांगण्यात आले. नोटाबंदीनंतर कॅशलेस व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली. मात्र या व्यवहारांवर लागणाऱ्या शुल्कांबद्दल ग्राहकांच्या मनात नाराजी आहे. लोक स्वत:च्या खिशावर भार देऊन कॅशलेस व्यवहार करणार नाहीत, असे अनेक तज्ज्ञांनी अहवालांच्या माध्यमातून सरकारला सांगितले आहे. सरकारने नोटाबंदीनंतर कॅशलेस व्यवहारांना चालना देण्यासाठी अनेक पावले उचलली. कॅशलेस व्यवहारांना यूपीआय आधारित करण्यासाठी सरकारने 'भीम ॲप' लॉन्च केले. याशिवाय डेबिट आणि क्रेडिट कार्डच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांचे प्रमाण वाढवण्यासाठी



'पॉईंट ऑफ सेल्स' (पीओएस) यंत्रांची संख्यादेखील वाढवण्यात आली. मात्र डेबिट कार्डने केल्या जाणाऱ्या व्यवहारांवर शुल्क आकारणी केली जात असल्याने अनेकांमध्ये नाराजी आहे.

त्यामुळेच या शुल्कांमध्ये घट करण्याची किंवा ते पूर्णपणे रद्द करण्याचा रिझर्व्ह बँकेचा मानस आहे. सध्या डिजिटल व्यवहार करणाऱ्या ग्राहकांना सुविधा शुल्क, व्यवहार शुल्क, प्लास्टिक कार्डची किंमत, वार्षिक शुल्क यासारखे विविध शुल्क द्यावे लागते. त्यामुळे डिजिटल व्यवहार ग्राहकांसाठी महागडे ठरतात. नोटाबंदीनंतर चलन तुडवडा निर्माण झाल्याने डिजिटल व्यवहार वाढले होते. मात्र नोटांचा पुरवठा सुरळीत होताच, डिजिटल व्यवहार करणाऱ्यांचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले.